## कार्यालय मुख्य बिजोत्पादन अधिकारी
## मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, डॉ. पं दे कृ वि., वणी रंभापूर.

जा. क्रं. / मप्राप्र /तां /७१ /२०२४ दिनांक: ०१/०४/२०२४

### निविदा सूचना

**विषय:-** सन २०२४-२५ करिता मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र वणी रंभापूर अंतर्गत प्रक्षेत्रावरील तसेच इतर विभाग संबधित तांत्रिक कामे कंत्राटी पद्धतीने करण्याकरीता वैध परवानाधारक कंत्राट दाराकडून निविदा दर (कोटेशन) बोलविणे बाबत...

**संदर्भ:-** कुलसचिव कार्यालय जा.क्रं.बीईए /आस्था/कंत्राटी/कर्म/२०२१/५९४/दिनांक.२२ जून २०२१

वरील संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र वणी रंभापूर अंतर्गत विविध विभागाचे प्रक्षेत्रावरील कामा व्योतिरिक्त, बीयाने प्रक्रिया केंद्र, विकास विभाग, कर्मशाळा विभाग तांत्रिक विभाग, सुरक्षा व इतर विभाग संबधित अकुशल व तांत्रिक कामे कंत्राटी पद्धतीने करण्याकरिता वैध परवानाधारक कंत्राटीदाराकडून निविदा दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा मसुदा/निविदेचे स्वरूप सोबत जोडण्यात आले आहे.

**अटी व शर्ती**

१. निविदा पत्रक /कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ६.०० या वेळेत स्वीकारल्या जातील.
२. निविदा/कोटेशन **मुख्य बिजोत्पादन अधिकारी, मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर** या नावाने सीलबंद लिफाफ्यात पाठवावी
३. कंत्राटदाराकडे संबधित कामाचा वैध परवाना असणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराला परवाना व संबधित इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.
४. निविदा/कोटेशनमधील संबधीत कामे कंत्राट पद्धतीने करण्याचे दर नियमाप्रमाणे सर्व करासह नमूद करण्यात यावे तसेच त्या कराचा विहित मुदतीमध्ये भरणा करण्याची संपूर्ण जबाबदारी संबधित निविदाधारकाची राहील. करा संबधी कोणतीही तक्रार असल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.
५. कंत्राट पद्धतीने प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कामे तसेच बीजप्रक्रिया केंद्र, विकास विभाग, कर्मशाळा विभाग व इतर विभाग संबधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांचे व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबधित कंत्राटदाराची राहील.
६. मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर अंतर्गत संपूर्ण विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कामे करीत असतांना पिकांचे/फळबागेचे तसेच बीजप्रक्रिया केंद्र, विकास विभाग, कर्मशाळा विभाग व इतर विभाग संबधित तांत्रिक कामे करीत असतांना यंत्राचे/वहानाचे/नवीन/सुट्या भागाचे ई. नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबधित कंत्राट दाराकडून वसूल करण्यात येईल.
७. प्रक्षेत्रावरील विभागावर बिजोत्पादन कामे तसेच बीजप्रक्रिया केंद्र, विकास विभाग, कर्मशाळा विभाग व इतर विभाग संबधित तांत्रिक कामे करतेवेळी कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी/झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबधित कंत्राटदाराची राहील.
८. विभागावर देण्यात आलेले बिजोत्पादन कामे तसेच बीजप्रक्रिया केंद्र, विकास विभाग, कर्मशाळा विभाग व इतर विभाग संबधित तांत्रिक कामे पूर्ण करण्यात यावे, कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहिल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.
९. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशीत केलेल्या नियमांचे पालन करणे संबधित कंत्राटदारांना बंधनकारक राहील.
१०. कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी. अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.
११. या कार्यालया तर्फे कंत्राटदारास कामे करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे साहित्य पुरविण्यात येणार नाही. संबधित काम करण्याकरिता आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याची संपूर्म जबाबदारी संबधित कंत्राटदाराची राहील.
१२. कंत्राटदारास संबधित कामाचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल.

... 2

१३. प्रक्षेत्रावरील विभागावर कामे तसेच बीजप्रक्रिया केंद्र व वाहन विभाग संबधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांना, कामगार (Labour Act) कायद्यानुसार किमान वेतन, विमा संरक्षण,भविष्य निर्वाह निधी देणे, क्याशलेस पद्धतीचा अवलंब करणे तसेच सर्व प्रकारचे करांचा नियमाने व नियमित भरणा करणे इत्यादींची संपूर्ण जबाबदारी संबधित कंत्राटदाराची राहील.

१४. प्रक्षेत्रावरील विभागावर संबधित कामे तसेच बीजप्रक्रिया केंद्र, विकास विभाग, कर्मशाळा विभाग व इतर विभाग संबधित कामेकरीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/मा. संशोधन संचालक डॉ.पं.दे.कृ.वी.अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ.पं.दे.कृ.वी.अकोला यांचा राहील आणि तो सर्वाना मान्य करणे बंधनकारक राहील.

१५. प्रक्षेत्रावरील विभागावर बिजोत्पादन कामे तसेच बीजप्रक्रिया केंद्र, विकास विभाग, कर्मशाळा विभाग व इतर विभाग संबधित तांत्रिक कामे हि १२ महिन्यातील खरीप, रब्बी व उन्हाळी या तिन्ही हंगामा करिता असून कामाचे दर १२ महिन्याकरिता वैध राहतील. तसेच १२ महिने काम केले म्हणून स्थाई बाबतचा दावा करता येणार नाही.

१६. मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र वणी रंभापूर अंतर्गत विभागावर बिजोत्पादन संबधित कामे तसेच बीजप्रक्रिया केंद्र व वाहन विभाग संबधित तांत्रिक कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी हे शासनाने दिलेल्या वय मर्यादेत आसवे व त्यास कोणत्याही प्रकारचे अपंगत्व नसून ते शारीरिक दृष्ट्या सक्षम असावेत.

१७. बिजोत्पादन संबधित कामे तसेच बीजप्रक्रिया केंद्र, विकास विभाग, कर्मशाळा विभाग व इतर विभाग संबधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांचे व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबधित कंत्राटदाराची राहील.

१८. मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र वणी रंभापूर कार्यालया अंतर्गत बीज प्रक्रिया केंद्रे, विकास विभाग, कर्मशाळा विभाग व इतर विभाग संबधित तांत्रिक कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्याकडे संबधित तांत्रिक कामाची पदविका/आयटीआय प्रमाणपत्र/ वाहन चालविण्याचा परवाना व कामचा अनुभव असणे बंधनकारक राहील व त्या बाबतचे दस्तावेज कामावर लावते वेळ पुरवावे लागतील याची संपूर्ण जबाबदारी संबधित कंत्राटदाराची राहील.

१९. मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र वणी रंभापूर कार्यालया अंतर्गत बीज प्रक्रिया केंद्रे व वाहान विभाग संबधित तांत्रिक कामे करतेवेळी कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबधित कंत्राटदाराची राहील.

२०. काम करतेवेळी, सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे व संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असल्याचे रु ५०० चे स्टंप पेपर वर करारनामा सादर करणे संबधित कंत्राटदारास बंधनकारक राहील.

२१. वरीलप्रमाणे अटी व शर्तीस आधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा व मसुदा तपशिला नुसार दिनांक ११/०४/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावे.

09/08/24

मुख्य बिजोत्पादन अधिकारी
म.प्रा.प्र. वणी रंभापूर

3...

## निविदा (कोटेशन) मसुदा

सन २०२४-२५ करिता मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र वणी रंभापूर अंतर्गत भांडार, कर्मशाळा, विकास, लेखा, सुरक्षा, तांत्रिक विभाग व संबधित तांत्रिक कामे बह्यास्त्रोत/कंत्राट पद्धतीने करण्याचे दर खालील प्रमाणे आहेत.

| अ क्रं | कामाचा तपशील | दर (रु) | शेरा |
|---|---|---|---|
| १ | बीयाणे प्रक्रिया यंत्र चालक | प्रती दिन/८ तास | बीयाणे प्रक्रिया यंत्र चालकाचा अनुभव |
| २ | भांडार/बीयाणे प्रक्रिया केंद्रातील कामे- (बीज प्रक्रिया, बॅग भरणे, टॅगींग, बॅग शिलाई, बॅग उचलणे ईत्यादी कामे) | प्रती दिन/८ तास | बीयाणे प्रक्रिया केंद्रामध्ये कामाचा अनुभव आवश्यक |
| ३ | जीप, कार, मिनी ट्रक, पिकअप, ट्रक व इतर वहाने चालविणे | प्रती दिन/८ तास | वाहन चालक (वैध परवानाधारक) |
| ४ | ट्रक्टर चालक (शेती संबधित तिन्ही हंगामात कामे करणे) | प्रती दिन/८ तास | ट्रक्टर चालक (वैध परवानाधारक) |
| ५ | हार्वेस्टर चालक | प्रती दिन/८ तास | हार्वेस्टर चालविण्याचा अनुभव प्रमाणपत्र |
| ६ | वाहन, कृषि यंत्रे, औजारे दुरुस्ती तसेच सर्व प्रकारचे कृषि औजाराची वेल्डिंगची कामे करणे | | काम करण्याचा अनुभव |
| ७ | वाहन पंचर काढणे (सर्व प्रकारचे वाहन) | | काम करण्याचा अनुभव |
| ८ | वायरमन, मेक्यानिक | प्रती दिन/८ तास | आयटीआय प्रमाणपत्र आवश्यक. वायरमन व मेक्यानिक काम करण्याचा अनुभव |
| ९ | गवंडी | प्रती दिन/८ तास | गवंडी काम करण्याच अनुभव प्रमाणपत्र |
| १० | व्हॉलमन | प्रती दिन/८ तास | जाकवेल हाताळण्याचा अनुभव प्रमाणपत्र |
| ११ | कार्यालयातील दैनंदिन कामे, कार्यालय उघडणे व बंद करणे, कार्यालयात साफसफाई ठेवणे, | प्रती दिन/८ तास | मजूर |
| १२ | मदतनीस | प्रती दिन/८ तास | मजूर |
| १३ | संगणक चालक | प्रती दिन/८ तास | संगणक, MSCIT प्रमाणपत्र व कामाचा अनुभव आवश्यक |
| १४ | फळ रोपवाटिका तंत्रज्ञ | प्रती दिन/८ तास | फळ वाटिका कामाचा किमान २ वर्षाचा अनुभव |

निविदा सुचानामधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्स्वस्वी मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक:-

स्वाक्षरी

नाव व संपूर्ण पत्ता

मो.नं:-